महाराष्ट्र शासन
कृषि संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
दूरध्वनी क्रमांक- ०२०-२६०५५३२२/ email- jdasoil@rediffmail.com

जा.क्र.कृआ/वै.शेततळे/मार्गदर्शक-सूचना/मृद-७/३७२३२/२०२२, दिनांक ७-Nov-२२

प्रति,

१)विभागीय कृषि सहसंचालक,
(सर्व)

२)जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
(सर्व)

**विषय: मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक सूचना - २०२२-२३**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.कोशाशे-४२१८/प्र.क्र.८६/८-अे, दिनांक १९ ऑगस्ट, २०१९.
२) शासन निर्णय क्र.प्रकृसिं-०६१९/प्र.क्र.१६४/१४-अे, दिनांक १८नोव्हेंबर, २०२१.
३) शासन निर्णय क्र.शाशेअ-२०२२/प्र.क्र.७५/१४-अे, दिनांक २९ जून, २०२२.

राज्यातील ८२ टक्के शेती ही सर्वस्वी पावसावर अवलंबून असलेली कोरडवाहू शेती आहे. राज्याच्या विविध भागातील पावसाचे असमान वितरण आणि पावसातील अनिश्चित येणारे खंड या प्रमुख नैसर्गिक आपत्ती आहेत. यामुळे सिंचनाअभावी पिक उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येते. जेथे पाण्याचा जास्त ताण पडतो तेथील पिके नष्ट देखील होतात. पर्यायाने शेतक-यांचे आर्थिक नुकसान होते. जेव्हा मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो तेव्हा ओढे, नाले, नदी इत्यादीद्वारे वाहून जाणारा अतिरिक्त अपधाव उपसून त्याची साठवणूक करण्याकरीता शेतावर शेततळ्यासारखी पायाभूत सुविधा उभी करण्यास चालना देणे हा यावरील एक उपाय आहे.

राज्यात पर्जन्याधारीत शेतीसाठी पाणलोटावर आधारीत जलसंधारणाच्या उपाययोजनांद्वारे पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी यापूर्वी शासनाने शेततळे योजना अनुदानावर राबविलेली आहे. त्यामुळे शेतक-यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. शेतक-यांना आर्थिक परिस्थितीमुळे शेततळे खोदकामासाठी येणारा खर्च करणे शक्य होत नाही. सद्यस्थितीत राज्यातील शेतक-यांना शेततळे खोदकामासाठी शासनाची कोणतीही योजना कार्यान्वित नसल्याने महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथे नमूद दिनांक २९ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेचा विस्तार करून या योजनेत वैयक्तिक शेततळे या बाबीचा समावेश केलेला आहे.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे हा घटक राबविण्याकरीता पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) लाभार्थी पात्रता:

१.१) अर्जदार शेतकऱ्यांकडे स्वत: च्या नावावर किमान ०.६० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. क्षेत्र धारणेस कमाल मर्यादा नाही.

१.२) अर्जदार शेतकऱ्याची जमीन शेततळे खोदण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आवश्यक राहील. जेणेकरून वाहून जाणारे पावसाचे पाणी नैसर्गिक प्रवाहाद्वारे शेततळ्यात साठविणे करीता पुनर्भरण करणे शक्य होईल.

१.३) अर्जदार शेतक-यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी किंवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे या घटकाकरिता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

२) लाभार्थी निवड:

शासन परिपत्रक क्रमांक ०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दिनांक ०४/११/२०२० नुसार महा-डीबीटी पोर्टलवर कृषि विभागाने विकसीत केलेल्या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांचा कोणत्याही विशिष्ट योजनेस अर्ज घेण्यात येत नसून तो शेती निगडीत विविध बाबीसाठी घेण्यांत येत आहे. त्या बाबींकरीता कोणत्या योजनेतून लाभ देता येईल याबाबत संगणकीय प्रणाली एकत्रित सोडतीमध्ये निर्णय घेईल. त्यानुसार मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतंर्गत वैयक्तिक शेततळे या घटकासाठी उपलब्ध अनुदानाच्या प्रमाणात संगणकीय प्रणालीतून होणाऱ्या सोडतीनुसार लाभ देण्यांत येईल.

३) शेततळयाच्या जागा निवडीचे तांत्रिक निकष:

३.१) ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे, अशी जमिन असलेल्या जागेची निवड करावी. काळी जमिन ज्यात चिकण मातीचे प्रमाण जास्त आहे अशा जमिनी शेततळ्यास योग्य असल्याने निवड करण्यात यावी.

३.२) मुरमाड, वालुकामय, सच्छिद्र खडक अशी जमिन असलेली जागा शेततळ्यास निवडू नये.

३.३) जलपरिपुर्ण झालेल्या पाणलोट क्षेत्रात शेततळी प्राधान्याने घेण्यात यावीत.

३.४) टंचाईग्रस्त गावातील लाभ क्षेत्रात शेततळी घेण्यात यावीत. यासाठी जलसंपदा विभागाच्या शा. नि. क्रं. सीडीए-१०१५/२६/१५/लाक्षेवी (कामे), दि.१२ मार्च २०१५ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

३.५) ज्या ठिकाणी जमिनीचा उतार सर्वसाधारण ३ टक्क्याचे आत आहे, त्या ठिकाणी शेततळी घेण्यात यावीत.

३.६) नाल्याच्या /ओहोळाच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येवू नये.

३.७) इनलेट/ आऊटलेटसह शेततळ्यासाठी पाणलोट क्षेत्रातून येणारे पाणी (अपधाव) हे शेततळ्याच्या पाणीसाठा क्षमतेपेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.

३.८) इनलेट / आऊटलेट विरहीत शेततळ्यासाठी पुनर्भरणाकरीता अतिरिक्त अपधाव उपलब्ध असल्याची खातरजमा करण्यात यावी.

३.९) सभोवतालच्या जमिनीत दलदल व चिबड होईल तसेच शेततळ्यातून पाणी पाझरून लगतच्या शेतक-याच्या स्थावर/जंगम मालमत्तेचे नुकसान होईल अशा जमिनी शेततळ्यासाठी निवडण्यात येवू नयेत.

३.१०) शेततळ्याला लागणारी जागा शेतकऱ्यांनी स्वखुशीने व विनामुल्य द्यावयाची आहे.

४) शेततळ्यासाठी आकारमान निहाय अनुज्ञेय अनुदान:

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत विविध आकारमानाच्या शेततळ्यासाठी कमाल रक्कम रुपये ७५०००/- (अक्षरी रक्कम रूपये, पंच्याहत्तर हजार मात्र) रकमेच्या मर्यादेत अनुदान देय राहील. वैयक्तिक शेततळे खोदकामासाठी आकारमान निहाय रुपये ७५०००/- (अक्षरी रक्कम रूपये, पंच्याहत्तर हजार मात्र) रक्कमेच्या मर्यादेत अनुज्ञेय असलेल्या अनुदानाचा तपशील खालील तक्ता “अ” व “ब” मध्ये नुमद करण्यात आलेला आहे.

तक्ता “अ”

यंत्राव्दारे इनलेट /आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅपसह शेततळे

(रक्कम रुपये)

| अ. क्र. | आकारमान (मीटरमध्ये) | बाजू उतार (१:१) | | बाजू उतार (१:१.५) (काळ्या मातीमध्ये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र |
| १ | १५X१५X३ | २३,८८१ | २६,०१० | १९,६९३ | २१,४९२ |
| २ | २०X१५X३ | ३२,०३४ | ३४,८२१ | २६,७९९ | २९,१७४ |
| ३ | २०X२०X३ | ४३,६७८ | ४७,३९८ | ३७,३९५ | ४०,६२१ |
| ४ | २५X२०X३ | ५५,३२१ | ५९,९७४ | ४७,९९१ | ५२,०६८ |
| ५ | २५X२५X३ | ७०,४५५ | ७५,००० | ६२,०७८ | ६७,२८० |
| ६ | ३०X२५X३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |
| ७ | ३०X३०X३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |
| ८ | ३४X३४X३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |

तक्ता "ब"

यंत्राव्दारे इनलेट /आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅप विरहीत शेततळे

(रक्कम रुपये)

| अ. क्र. | आकारमान (मीटरमध्ये) | बाजू उतार (१:१) | | बाजू उतार (१:१.५) (काळ्या मातीमध्ये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र |
| १ | १५X१५X३ | १८,६२१ | २०,२३५ | १४,४३३ | १५,७१७ |
| २ | २०X१५X३ | २६,७७४ | २९,०४६ | २१,५३९ | २३,३९९ |
| ३ | २०X२०X३ | ३८,४१७ | ४१,६२३ | ३२,१३५ | ३४,८४६ |
| ४ | २५X२०X३ | ५०,०६१ | ५४,१९९ | ४२,७३१ | ४६,२९३ |
| ५ | २५X२५X३ | ६५,१९४ | ७०,५४० | ५६,८१८ | ६१,५०५ |
| ६ | ३०X२५X३ | ७५,००० | ७५,००० | ७०,९०४ | ७५,००० |
| ७ | ३०X३०X३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |
| ८ | ३४X३४X३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |

५) वैयक्तिक शेततळे आकारमान व खोदकामाचे परीमाण:

५.१) आकारमान निहाय शेततळ्याचे अपेक्षित खोदकामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. यंत्राव्दारे इनलेट /आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅपसह शेततळे

| अ.क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटरमध्ये) | खोदकामाचे परीमाण (घ.मी.) | |
|---|---|---|---|
| | | बाजू उतार (१:१) | बाजू उतार (१:१.५) (काळ्या मातीमध्ये) |
| १ | १५X१५X३ | ४४१ | ३५१ |
| २ | २०X१५X३ | ६२१ | ५०८.५० |
| ३ | २०X२०X३ | ८७६ | ७४१ |
| ४ | २५X२०X३ | ११३१ | ९७३.५० |
| ५ | २५X२५X३ | १४६१ | १२८१ |
| ६ | ३०X२५X३ | १७९१ | १५८८.५० |
| ७ | ३०X३०X३ | २१९६ | १९७१ |
| ८ | ३४X३४X३ | २८९२ | २६३१ |

ब. यंत्राव्दारे इनलेट /आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅप विरहीत शेततळे

| अ.क्र. | शेततळ्याचे आकारमान (मीटरमध्ये) | खोदकामाचे परीमाण (घ.मी.) | |
|---|---|---|---|
| | | बाजू उतार (१:१) | बाजू उतार (१:१.५) (काळ्या मातीमध्ये) |
| १ | १५X१५X३ | ४४१ | ३५१ |
| २ | २०X१५X३ | ६२१ | ५०८.५० |
| ३ | २०X२०X३ | ८७६ | ७४१ |
| ४ | २५X२०X३ | ११३१ | ९७३.५० |
| ५ | २५X२५X३ | १४६१ | १२८१ |
| ६ | ३०X२५X३ | १७९१ | १५८८.५० |
| ७ | ३०X३०X३ | २१९६ | १९७१ |
| ८ | ३४X३४X३ | २८९२ | २६३१ |

५.२) या योजनेंतर्गत समाविष्ट विविध आकारमानाच्या शेततळ्यापैकी कोणत्याही एका आकारमानाच्या शेततळ्याकरीता मागणी अर्ज महा-डीबीटी पोर्टलवर करता येईल. यामध्ये जास्तीत जास्त ३४x३४x३ मीटर व कमीत कमी १५x१५x३ मीटर आकारमानाचे इनलेट आऊटलेटसह किंवा इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे घेता येईल. शेततळ्याचे आकारमान हे पाणलोट क्षेत्रातून उपलब्ध होणारा अपधाव विचारात घेऊन उपलब्ध होणा-या पाणीसाठ्याच्या प्रमाणानुसार निश्चित करावे. इनलेट आऊटलेट विरहीत प्रकाराच्या शेततळयात पाणी भरण्याची कार्यवाही पावसाळ्यात अतिरीक्त वाहून जाणाऱ्या पाण्यातून प्राधान्याने करावी.

५.३) वैयक्तिक शेततळ्यासाठी विविध आठ (८) प्रकारचे आकारमान दर्शविण्यात आले असले तरी शेततळ्याचे आकारमान व होणारे खोदकाम यानुसार अनुदान देय राहील. लाभार्थ्याची मागणी व शेत परिस्थितीनुसार शेततळ्याची लांबी, रुंदी कमी जास्त करण्यास मुभा राहिल. तथापि मंजूर आकारमानापेक्षा जास्त आकारमानाचे शेततळे घ्यावयाचे असल्यास मंजूर अनुदानापेक्षा जास्त लागणारा खर्च हा लाभार्थी शेतक-याने स्वतः करावयाचा आहे.

५.४) शेततळ्याच्या आकारमानानुसार देय होणारी अनुदानाची रक्कम मुद्या क्रमांक ४ मधील तक्ता क्र.अ व ब मध्ये नमुद केलेनुसार निश्चित करण्यात आली आहे. तथापि देय अनुदानाची कमाल रक्कम रूपये ७५,०००/- इतकी राहील. रक्कम रूपये ७५,०००/- पेक्षा जास्त खर्च झाल्यास सदर अतिरिक्त खर्च संबधित लाभार्थ्याने स्वत: करणे अनिवार्य राहील.

६.जिल्हानिहाय लक्षांक:

राज्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता १३५०० वैयक्तिक शेततळे पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले असून जिल्हानिहाय लक्षांक जिल्हयाची प्रवर्गनिहाय खातेदार संख्या व पेरणी क्षेत्र या दोन प्रमुख बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे जिल्हा निहाय लक्षांक सोबतच्या परिशिष्ट “१” मध्ये देण्यात आलेला आहे. जिल्हयासाठी निर्धारीत केलेल्या शेततळयाच्या लक्षांकाच्या व महा-डीबीटीवर प्राप्त आर्थिक लक्षांकाच्या अधिन राहूनच अर्ज मंजूरी द्यावी.

७.वैयक्तिक शेततळे योजनेची अंमलबजावणी:

७.१) योजनेची प्रचार व प्रसिध्दी:-

वैयक्तिक शेततळे योजने अंतर्गत शेततळ्याच्या कार्यक्रमास क्षेत्रिय स्तरावर स्थानिक वर्तमानपत्रे, कृषि मासिके याबरोबरच आकाशवाणी, दुरदर्शन इत्यादी माध्यमातून व्यापक प्रसिध्दी द्यावी. विभागस्तरावरून देखील दुरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे, भित्तीपत्रके, द्दकश्राव्य माध्यमाव्दारे प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी.

कृषि विभागाची सर्व कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये, तहसिल कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयात नोटिस बोर्डवर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. कृषि विभागाच्या यंत्रणेमार्फत वैयक्तिक व सामूहिक बैठका तसेच विविध मोहिमा अंतर्गत घेण्यांत येणाऱ्या मेळाव्यात मार्गदर्शन करण्यांत यावे. इच्छुक लाभार्थींना महा-डीबीटी पोर्टलवर मुदतीत अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात यावे. तसेच तालुका पातळीवर असलेले सामुदायिक सेवा केंद्र (CSC) धारकांना सुध्दा अवगत करण्यांत यावे. या कार्यक्रमातंर्गत घेण्यात आलेल्या शेततळ्यांमुळे संरक्षित सिंचनासाठी व पुरक कृषि उद्योगासाठी (उदा. पशुसंवर्धन, मत्स्योत्पादन ई.) वापर करता येईल. यशस्वी अंमलबजावणी करणाऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या यशोगाथा तयार कराव्यात जेणेकरुन परिसरातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल.

७.२) प्रशिक्षण:-

१. या योजनेची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी कृषि विभागाचे क्षेत्रिय स्तरावरील कर्मचारी यांचे तालुका पातळीवर एक दिवसाचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावे. सदर प्रशिक्षणासाठी कृषि विज्ञान केंद्र, कृषि संशोधन केंद्र, कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ तसेच प्रशिक्षित अधिकारी / कर्मचारी यांचा सहभाग घेण्यांत यावा.
२. सदरच्या प्रशिक्षणास जिल्हा पातळीवरील योजना अमंलबजावणीशी संबंधित अधिकारी यांना देखील सहभागी करून घेण्यांत यावे.

७.३) शेततळे घटक अंमलबजावणीची प्रक्रिया :

अ) इच्छुक शेतकऱ्यांनी महा-डीबीटी पोर्टलद्वारे अर्ज करणे:-

शासनाच्या दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२० च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार कृषि विभागाच्या योजनांची महा-डीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करणेसाठी शासन मान्यता देण्यांत आलेली आहे. योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत केली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या बाबींच्या निवडीचे स्वातंत्र्य देण्यांत आले असून शेतकऱ्यांनी शेतीशी निगडीत विविध बाबीकरिता अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यांत आली आहे. सदर बाबी ज्या योजनेतून देता येऊ शकतील त्या योजनातंर्गत पात्र शेतकऱ्यांची संगणकीय सोडत पध्दतीने निवड करण्यांत येणार आहे. यामुळे योजनाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता व सुसूत्रता येऊन वरिष्ठ स्तरावरून योजनांच्या अंमलबजावणी प्रगतीचे प्रभावी सनियंत्रण करणे शक्य होणार आहे.

ब) योजनेचा लाभ घेण्याच्या दृष्टीने महा-डीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे टप्पे:-

१) संकेतस्थळ :-

महा-डीबीटी पोर्टलचे https://mahadbtmahit.gov.in हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावरील "शेतकरी योजना" हा पर्याय निवडावा. शेतकरी स्वतःचा मोबाईल, संगणक, लॅपटॉप, टॅबलेट, सामुदायिक सेवा केंद्र (CSC), ग्रामपंचायतमधील संग्राम केंद्र यासारख्या माध्यमातून संकेतस्थळावर जाऊन अर्ज करू शकतील.

२) अर्जदार नोंदणी :-

अर्जदारांनी प्रथमत: वापरकर्त्याचे नाव (User Name) व संकेत शब्द (Password) तयार करून घ्यावा व आपले खाते उघडावे. त्यानंतर पुन्हा लॉगीन करावे. अर्जदारांना वैयक्तिक शेततळे या घटकासाठी "वैयक्तिक लाभार्थी" म्हणून नोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. अर्जदारांनी त्यांच्या इच्छेनुसार पर्याय निवडल्यानंतर महा-डीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याबाबत सविस्तर माहिती युजर मॅन्युअलद्वारे पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३) आधार क्रमांक प्रमाणीकरण :-

"वैयक्तिक लाभार्थी" म्हणून नोंदणी करू इच्छिणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना त्यांचा आधार क्रमांक सदर संकेतस्थळावर प्रमाणित करून घ्यावा लागेल. त्याशिवाय त्यांना अनुदानाचे वितरण करण्यात येणार नाही.

४) वैयक्तिक तपशील भरणे :-

"वैयक्तिक लाभार्थी" म्हणून नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना प्रथमत: त्यांचा वैयक्तिक तपशील भरणे बंधनकारक आहे. याअंतर्गत अर्जदारांना वैयक्तिक माहिती,पत्ता व

स्वतःच्या नावे असलेल्या शेतजमिनीचा तपशील सादर करावा लागेल. त्याचप्रमाणे योजनांच्या आवश्यकतेनुसार पिकांचा तपशील, कुटुंबाचा तपशील, शेतावरील वीज जोडणी उपलब्धता, सिंचन क्षेत्र स्त्रोत इत्यादी बाबींचा तपशील भरावा लागेल. या सदरामध्ये तारांकित (*) बाबींची माहिती देणे अनिवार्य आहे. सदर माहिती भरल्यानंतरच लाभार्थींना त्यांच्या वैयक्तिक तपशीलावरून ते विविध योजनांमधील ज्या बाबींना पात्र ठरतील त्या बाबींच्या निवडीसाठी त्यांना अर्ज करता येईल.

५) अर्ज शुल्क :-

ऑनलाईन पोर्टलवर अर्ज करताना शेतकऱ्यांना रक्कम रुपये २० अधिक रक्कम रुपये ३.६० वस्तू व सेवाकर असे एकूण रक्कम रूपये २३.६० अर्ज शुल्क म्हणून ऑनलाइन भरावयाचे आहे. अर्ज सादर करण्याच्या अंतीम मुदतीपर्यंत (सोडतीचे दिनांकापर्यंत) शेतकऱ्यांना अर्जात निवडलेल्या बाबींमध्ये विनाशुल्क बदल करता येईल, मात्र मुदत संपल्यानंतर त्यामध्ये बदल करता येणार नाही.

६) कागदपत्रे सादर करणे :-

संगणकीय सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांना वैयक्तिक शेततळे या बाबीसाठी त्यांची कागदपत्रे ( जमिनीचा ७/१२, ८-अ उतारा, आधारकार्ड झेरॉक्स, बॅक पासबुक झेरॉक्स, हमीपत्र, जातीचा दाखला) महा-डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्याबाबत लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. शेतकऱ्यांनी सदरची कागदपत्रे महा-डीबीटी पोर्टलवर विहित मुदतीत आपलोड करावयाची आहेत. जे शेतकरी विहीत मुदतीत कागदपत्रे अपलोड करणार नाहीत त्यांची निवड रद्द होईल. ही प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन केली असल्यामुळे मोबाईलवर प्राप्त होणाऱ्या संदेशानुसार मागविण्यात आलेल्या कागदपत्रांशिवाय इतर कोणत्याही प्रकारची कागदपत्रांची शेतकऱ्यांकडे मागणी करण्यात येऊ नये.

७) लघुसंदेश (SMS) सुविधा :-

लाभार्थी शेतकऱ्यांना अर्ज करतेवेळी तसेच अर्ज केल्यानंतर पुढील प्रत्येक टप्प्यावर करावयाच्या कारवाईबाबत त्यांच्या मोबाईलवर संदेशाद्वारे वेळोवेळी सूचना देण्यात येतील.

८) तक्रार /सूचना :-

शेतकऱ्यांना अर्ज करतेवेळी काही अडचणी येत असतील अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास ते महा-डीबीटी पोर्टलवरील “तक्रारी/सूचना” या बटनावर क्लिक करून आपली तक्रार/सूचना नोंदवू शकतील.

८) लाभार्थी निवडीची एकत्रित संगणकीय सोडत :-

शासन परिपत्रक क्रमांक: ०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दिनांक ०४/११/२०२० नुसार महा-डीबीटी पोर्टलवर कृषि विभागाने विकसीत केलेल्या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांचा

कोणत्याही विशिष्ट योजनेस अर्ज घेण्यात येत नसून तो शेती निगडीत विविध बाबींसाठी घेण्यांत येत आहे. त्या बाबींकरीता कोणत्या योजनेतून लाभ देता येईल याबाबत संगणकीय प्रणाली एकत्रित सोडतीमध्ये निर्णय घेईल. त्यानुसार मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतंर्गत वैयक्तिक शेततळे या घटकासाठी उपलब्ध अनुदानाच्या प्रमाणात संगणकीय प्रणालीतून होणाऱ्या सोडतीनुसार लाभ देण्यांत येईल. महा-डीबीटी पोर्टलद्वारे कृषि विभागाच्या सर्व योजनांसाठी तालुका स्तरावर एकत्रित संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. सोडतीत प्रत्येक तालुका / जिल्हानिहाय निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी प्रवर्गनिहाय पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल.

संगणकीय सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (SMS) त्यांचे निवडीबाबत अवगत करण्यात येईल. सदर सोडतीत ज्या शेतकऱ्यांची निवड झाली नसेल त्यांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात येईल. प्रतिक्षा यादीतील शेतकऱ्यांची चालू आर्थिक वर्षांत निवड न झाल्यास ते त्या आर्थिक वर्षात प्रतिक्षा यादीत राहतील आणि ते पुढील वर्षी देखील त्याच अर्जाच्या आधारे लाभार्थी निवडीस पात्र राहतील.सदर घटकाकरीता त्यांनी पुनश्चः अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

९) लक्षांक वितरण :-

"वैयक्तिक शेततळे" बाबीकरीता उपलब्ध होणारी अर्थसहाय्याची रक्कम (निधी) विचारात घेऊन राज्यस्तरावरून जिल्ह्यांना आर्थिक लक्षांक वाटप पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल.

९.१) प्रत्येक जिल्ह्यास वैयक्तिक शेततळे बाबीचा लक्षांक जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गनिहाय खातेदारांची संख्या, पेरणी क्षेत्र या प्रमुख निकषावर आयुक्तालय स्तरावरून महा-डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन देण्यांत येईल.

९.२) जिल्हास्तरावरून तालुक्यांना लक्षांक वाटप करतेवेळी तालुक्यातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गनिहाय खातेदारांची संख्या, पेरणी क्षेत्र यानुसार वाटप करण्यात यावा.

९.३) मंजूर लक्षांकाच्या ३० टक्के निधी महिला खातेदार शेतकऱ्यांसाठी तर ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात येईल. पुरेशा प्रमाणात व उपलब्ध निधी एवढे महिला व दिव्यांग शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले नाहीत तर सदरचा निधी इतर शेतकऱ्यांना वापरता येईल. उपलब्ध निधीपेक्षा जास्त प्रमाणात महिला व दिव्यांग शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले असतील तर सर्वसाधारण प्रवर्गाच्या निधीमधून प्रथम प्रधान्याने महिला व दिव्यांग शेतकऱ्यांना अनुदान देय राहील.

९.४) एकत्रित सोडत प्रक्रियेनंतर काही तालुक्यात कमी अर्ज प्राप्त झाल्यामुळे तालुका किंवा जिल्हा स्तरावर लक्षांक शिल्लक राहिल्यास जिल्हास्तरावरून तात्काळ जाहिरात देऊन पुनश्च अर्ज करण्यास शेतकऱ्यांना आवाहन करण्यात यावे. नव्याने प्राप्त होणा-या अर्जासाठी पुन्हा एकत्रित संगणकीय सोडत प्रक्रिया राबवून लाभार्थी निवडण्यांत येतील. यानंतरही आर्थिक लक्षांक शिल्लक राहिल्यास संबंधित योजनांतर्गत अतिरिक्त निधीची मागणी असलेल्या

तालुका/जिल्हा/विभागास निधीचे वितरण करण्याबाबत यथास्थिती जिल्हा/विभाग/राज्य (कृषि आयुक्तालय) स्तरावरून यथोचित निर्णय घेण्यांत येईल. जेणेकरून तेथील प्रतीक्षा यादीतील पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देता येईल.

९.५) या योजनेअंतर्गत आर्थिक लक्षांकाचे फेरवितरण करतेवेळी प्रचलित कार्यपद्धतीनुसार प्रथमतः तालुकास्तरावर अतिरिक्त राहिलेल्या लक्षांकात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील मागणी असलेल्या अन्य तालुक्यांना मागणीच्या प्रमाणात फेरवितरण करावे. जिल्हास्तरावर अतिरिक्त ठरलेल्या लक्षांकाचे विभागीय कृषी सहसंचालक स्तरावर विभागातील अन्य जिल्ह्यांना मागणीनुसार फेरवितरण करावे. विभागस्तरावर लक्षांक शिल्लक असल्यास राज्यस्तरावरून मागणीनुसार इतर जिल्ह्यांना लक्षांकाचे फेर वितरण करण्यात येईल.

१०) वित्तीय लक्षांक व्यवस्थापन :-

"वैयक्तिक शेततळे" घटकाच्या वित्तीय लक्षांक व्यवस्थापनाचे कामकाज कृषी आयुक्तालय स्तरावरून करण्यात येईल. सदर घटकाकरिता प्राप्त होणारा वित्तीय लक्षांक महा-डीबीटी पोर्टलवर भरणे, त्याचे जिल्हानिहाय वितरण करणे, आवश्यकतेनुसार त्याचे फेरवितरण करणे इत्यादी कामासाठी व योजनेच्या वित्तीय लक्षांकाचे महा-डीबीटी पोर्टलवर व्यवस्थापन करण्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यांत आलेल्या आहेत. त्यानुसार कृषी आयुक्तालय स्तरावरून कार्यवाही करण्यांत येईल. कृषि आयुक्तालयातील कृषी उपसंचालक (अभियांत्रिकी) हे वैयक्तिक शेततळे घटकाचे योजना व्यवस्थापक (Scheme Manager) असतील. तसेच त्यांचेवर वैयक्तिक शेततळे या घटकाच्या वित्तीय लक्षांकाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असेल.

११) क्षेत्रीय स्तरावर करावयाची कामे :-

अ) शेतकऱ्यांच्या अर्जांची / कागदपत्रांची छाननी व पूर्वसंमती प्रदान करणे :-

१) संगणकीय सोडतीत ज्या शेतकऱ्यांची वैयक्तिक शेततळे या घटकाकरीता निवड झालेली असेल अशा शेतकऱ्यांच्या अर्जांची व कागदपत्रांची छाननी कृषी विभागाने निश्चित केलेल्या बहुस्तरीय पद्धतीने करण्यांत येईल. छाननीअंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश / पूर्वसंमती पत्र ऑनलाइन (Online) निर्गमित करण्यात येतील. तसेच (SMS) एसएमएसद्वारे सूचना देण्यात येतील.

२) महा-डीबीटी पोर्टलवर वैयक्तिक शेततळे घटकाचा लाभ घेण्यासाठी प्राप्त होणाऱ्या आर्जांची छाननी बहुस्तरीय पद्धतीने करण्याकरिता महा-डीबीटी पोर्टलमध्ये विविध टप्पे (Desk) निर्माण केलेले आहेत.

३) लाभार्थी शेतकऱ्यांच्या अर्जांची वेगवेगळ्या टप्प्यावर छाननी करावयाची असून त्याबाबतची कार्यवाही युजर मॅन्युअलमध्ये (User Mannual) तपशीलवार नमूद केलेली आहे. सदर युजर मॅन्युअल (User Mannual) हे http://workflow.mahaonline.gov.in या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

४) प्राप्त अर्ज व कागदपत्रांची प्रत्येक डेस्कद्वारे पडताळणी करून पात्र शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश / पूर्वसंमती पत्र निर्गमित करण्यात यावेत. सदर आदेश / पत्र शेतकऱ्यांना त्यांच्या महा-डीबीटी पोर्टलवरील खात्यामध्ये (Login) उपलब्ध होतील.

५) कार्यारंभ आदेश / पुर्वसंमती पत्र मिळालेल्या शेतकऱ्यांपैकी जे शेतकरी त्यांना मंजूर केलेल्या वैयक्तिक शेततळयाचे काम विहित कालावधीत करणार नाहीत, त्यांची पूर्वसंमती रद्द करण्यात येईल. त्यानंतर प्रतीक्षा यादीतील पात्र ठरणाऱ्या पुढील शेतकऱ्यांची संगणकीय सोडतीद्वारे निवड करण्यात येईल व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

६) महा-डीबीटी अंतर्गत योजनेच्या अंमलबजावणीशी निगडीत असलेल्या क्षेत्रिय अधिकारी/कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या लॉगीन आयडी व पासवर्डद्वारे महा-डीबीटी पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जांचा निपटारा करावयाचा आहे.

७) प्रत्येक डेस्कवर येणाऱ्या अर्जांचा निपटारा करण्याबाबत महा-डीबीटी पोर्टलवर विशिष्ट कालावधी विहित करण्यात येईल. त्यानुसार सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी निश्चित करून दिलेल्या कालावधीत अर्जांचा निपटारा करणे आवश्यक राहील.

८) लाभार्थी निवडीनंतर प्राप्त प्रस्तावांची पडताळणी झाल्यानंतर लाभार्थी लाभ घेऊ इच्छित असलेल्या अनुदानास पात्र ठरत आहे किंवा नाही याची तालुका कृषी अधिकारी यांनी खात्री करावी.

९) निवड झालेला लाभार्थी शेतकरी अनुदानास पात्र असल्याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांची खात्री पटल्यानंतर त्यांना वैयक्तिक शेततळे खोदण्यास कार्यारंभ आदेश / पूर्वसंमती पत्र देण्यात यावे.

१०) कार्यारंभ आदेश / पूर्वसंमती पत्र मिळालेल्या लाभार्थ्यांनी शेततळे खोदकाम स्वतः करून घ्यावे किंवा शेततळे खोदकाम करणाऱ्या यंत्रधारकाकडून करुन घेता येईल. यंत्रधारकास खोदकामाची रक्कम स्वतः लाभार्थी शेतकऱ्याने अदा करावयाची आहे.

ब) अनुदान मागणी करताना मोका तपासणी व भौगोलिक स्थान निश्चिती (जिओ टॅगिंग) करणे :

कार्यारंभ आदेश / पूर्वसंमती पत्र प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांनी वैयक्तिक शेततळे खोदल्यानंतर काम पूर्णत्वाचा दाखला व अनुदान मागणी अर्ज महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करावा. त्यानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी प्रत्यक्ष मोका तपासणी करतील. मोका तपासणीच्या वेळी पूर्ण झालेल्या शेततळ्याची मोजमापे घेण्यात यावीत. मोजमापानुसार येणारे परिमाण आणि त्याचे प्रचलित

दरानूसार होणारे देय अनुदान याचा अहवाल पोर्टलवर अपलोड करावा. खोदलेल्या परिमाणानुसार देय अनुदान गणना करण्यात यावी. मोका तपासणीचे वेळी भौगोलिक स्थान निश्चिती (जिओ टॅगिंग) देखील करण्यात यावे.

१२) अनुदान परिगणना :-

पूर्ण झालेल्या शेततळ्याची मोजमापे घेऊन त्यात नमूद केलेल्या आकारमानाच्या प्रमाणात शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार अनुदानाची परिगणना करण्यात यावी. मोजमापानुसार व आकारमानानुसार परिगणना केलेले अनुदान त्या-त्या आकारमानानूसार मुद्या क्रमांक-४ मधील (तक्ता अ व ब) निश्चित केलेल्या कमाल मर्यादेत संबंधित लाभार्थ्यांस देय राहील.

१३) अनुदान वितरण :-

१३.१) वैयक्तिक शेततळे खोदकामाची क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोका तपासणी पूर्ण केल्यानंतर त्याची महा-डीबीटी पोर्टलवर निश्चित केलेल्या पद्धतीने बहुस्तरीय छाननी करावी. छाननी झाल्यानंतर शेतकऱ्यांना अनुदान वितरणाची शिफारस क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेने करावी.

१३.२) शासन निर्णय क्रमांक:GAD-मातस-१८/सीआर-१३८/एस-१/३९, दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ अन्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यस्तरावरून (कृषी आयुक्तालय) केंद्रीय पद्धतीने लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्यावर अनुदान रक्कम वितरीत करण्यात येईल.

१३.३) कृषी आयुक्तालय स्तरावरून योजनेचे देयक कोषागारात पाठवणे व कोषागाराने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे लाभार्थ्यांना अनुदान वितरण करण्याची जबाबदारी सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांची राहील.

१४) अहवाल :-

वैयक्तिक शेततळे या घटकाचा भौतिक व आर्थिक साध्याचा अहवाल विहीत प्रपत्रात नियमीतपणे दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावा. विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागाचा एकत्रित अहवाल दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

१५) क्षेत्रीय तपासणी :-

वैयक्तिक शेततळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सनियंत्रण अधिकाऱ्यांनी खालील नेमून दिलेल्या प्रमाणात तपासणी करावी व तपासणी अहवाल सादर करावा.

| सनियंत्रण अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|
| विभागीय कृषी सहसंचालक | ०.५ टक्के |
| जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी | १ टक्के |
| उपविभागीय कृषी अधिकारी | ५ टक्के |
| तालुका कृषी अधिकारी | २५ टक्के |
| मंडळ कृषी अधिकारी | ५० टक्के |
| कृषी पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक | १०० टक्के |

सदर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

१६) लाभार्थ्यांची जबाबदारी :-

१) कृषि विभागाचे कृषि सहाय्यक यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील.

२) कार्यारंभ आदेश / पुर्वसंमती पत्र मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३) लाभार्थीने स्वतःचा राष्ट्रीयकृत बँक / इतर बँक मधील खाते क्रमांक संबंधित कृषि सहाय्यक यांचेकडे बँक पासबुकच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्ससह सादर करावा.

४) कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.

५) शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी.

६) शेततळ्याची निगा व दुरूस्तीची तसेच गाळ काढणेची जबाबदारी ई. संबंधीत लाभधारकांची राहील.

७) पावसाळ्यामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठीची व्यवस्था लाभार्थ्याने स्वतः करावी. उदा. प्रवाहाच्या दोन्ही बाजूने तुराट्या / पराट्याचे आवरण करुन संरक्षण देणे व इनलेट आऊटलेट जवळ ३ ते ४ फांदेरी बांध घालणे.

८) शेततळे पूर्ण झाल्यावर शेततळे योजनेचा ४x३ फूट आकाराचा बोर्ड लाभार्थ्याने लावणे बंधनकारक आहे.

९) नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

१०) मंजूर आकारमानाचे शेततळे खोदणे हे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.

११) इनलेट आऊटलेट विरहित शेततळी घेणा-या लाभार्थ्याकडे शेततळयामध्ये पाणी उचलून टाकण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा असणे आवश्यक आहे. तसेच अशा शेततळयासाठी शेतक-यांनी प्लॅस्टीक अस्तरीकरण स्वखर्चाने करावे.

१२) शेतक-यांनी परिशिष्ट - २ प्रमाणे विहीत प्रपत्रातील हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१३) काम पूर्ण होताच शेतक-याने परिशिष्ट - ६ प्रमाणे तालुका कृषी अधिकारी यांना कळवावे.

१७) कार्यान्वयीन यंत्रणेची जबाबदारी :-

१) अर्जदाराने अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी कृषि सहाय्यक यांनी करुन परिशिष्ट - ३ प्रमाणे दाखला देणे.

२) जागेची निवड कृषि सहाय्यक यांनी तांत्रिक निकषाप्रमाणे करणे व तसे प्रमाणपत्र/दाखला संबंधित लाभार्थ्यास परिशिष्ट - ४ प्रमाणे देणे.

३) शेततळ्याकरिता जागा योग्य असल्याचे आढळून आल्यानंतर संबंधीत कृषी सहाय्यक यांनी सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यतेसाठी तालुका कृषी अधिकारी यांना सादर करावे. तांत्रिक मान्यतेनंतर उपविभागीय कृषी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

४) तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनंतर तालुका कृषी अधिकारी यांनी सदर कामास परिशिष्ट-५ प्रमाणे कार्यारंभ आदेश / पुर्वसंमती पत्र द्यावे.

५) मंजूर आकारमानाप्रमाणे शेततळ्याची आखणी कृषि सहायक यांनी करुन देणे.

६) खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांनी लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे.

७) लाभधारकाने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे परिशिष्ट- ६ प्रमाणे लेखी कळविल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी कृषि सहाय्यक यांचेकडून झालेल्या कामाची प्रत्यक्ष मोजमापे घेणे. सदरची मोजमापे बरोबर असल्याबाबत कृषि पर्यवेक्षक यांनी मोका तपासणी करुन मोका तपासणी अहवाल (परिशिष्ट- ७) पोर्टलवर अपलोड करावा. मंडळ कृषि अधिकारी यांनी वरील मोका तपासणीची व कागदपत्रांची/प्रपत्रांची छाननी करुन अनुदानासाठी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे शिफारस करावी. देय रक्कम अदायगीसाठी शिफारस करणेपूर्वी लाभार्थ्यासह शेततळ्याचा फोटो GPS Image द्वारे वेबसाईटवर अपलोड करणे अनिवार्य राहील.

८) लाभार्थ्यांकडून त्याचा राष्ट्रीयकृत बँकेतील/इतर बँकेतील खाते क्रमांक पासबुकाच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्ससह प्राप्त करुन घ्यावा.

९) शेत परिस्थितीनुसार अथवा स्थानिक अडचणीमुळे आकारमानात बदल अथवा शेततळयाची लांबी, रुंदी कमी जास्त करण्याची आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे बदल करण्यास मुभा राहिल तथापि अशी मंजूरी खालील अटींच्या अधिन राहून देता येईल.

अ. मंजूर आकारमानापेक्षा जास्त आकारमानाचे शेततळयाचे प्रत्यक्ष खोदकाम झाल्यास मुळ मंजूर आकारमानाचे शेततळयासाठी देय अनुदानाप्रमाणे अनुदान देय राहील व जास्तीचा खर्च हा लाभार्थी शेतक-यांने स्वत: करावयाचा आहे.

ब. मंजूर आकारमानापेक्षा कमी आकारमानाचे शेततळयाचे प्रत्यक्ष खोदकाम झाल्यास मुळ मंजूर आकारमानाचे शेततळयासाठी देय असलेले अनुदानाऐवजी त्याचे खालील टप्प्यावरील कमी आकारमानाचे शेततळयासाठीचे देय अनुदानाप्रमाणे अनुदान देय राहील व जास्तीचा खर्च हा लाभार्थी शेतक-यांने स्वतः करावयाचा आहे. वरील (अ) व (ब) मध्ये नमूद अटी या अशा लाभार्थ्यास मान्य असलेबाबत लाभार्थीची लेखी संमती घेऊन आकारमान बदलास संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी मान्यता दयावी.

१०) मंजूर आकारमानाप्रमाणे खोदकाम करण्यास शेतपरिस्थिती व भूस्तरानुसार मर्यादा आल्यास अशा प्रकरणी तालुका कृषि अधिकारी यांनी स्वतः तपासणी करुन कमी आकारमानाचे काम अंतिम करता येईल, (तथापि झालेले काम हे किमान या शासन निर्णयातील नमूद शेवटच्या आकारमानाच्या म्हणजेच ४४१ घनमीटर इतक्या आकारमानाचे खोदकाम असणे आवश्यक आहे.) अशा प्रकरणी त्याचे खालील टप्प्यावरील देय अनुदान मापदंडाप्रमाणे देय राहील.

११) कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण झाल्यावरच अनुदानाची देय रक्कम बँक खात्यात जमा करावी.

१८) सनियंत्रण व नोडल अधिकारी :-

योजनेचे सनियंत्रण करणेसाठी कृषि आयुक्तालय स्तरावर संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन हे नोडल अधिकारी राहतील.

सोबत : परिशिष्ट १ ते ७

(रवींद्र भोसले)
संचालक
(मृ.सं.व.पा.क्षे.व्य.)

प्रत :- माहितीसाठी सादर.

१ मा. प्रधान सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२. अवर सचिव (कृषि), १४-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३. कृषि उपसंचालक (आयुक्त कृषि कक्ष), कृषि आयुक्तालय, म.राज्य, पुणे-०१.

परिशिष्ट -१

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत शेततळे योजनेकरीता जिल्हानिहाय वैयक्तिक शेततळे लक्षांक

| अ. क्र. | जिल्हा | अनुसूचीत जाती | अनुसूचीत जमाती | सर्वसाधारण | एकूण लक्षांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ४ | १७ | १०४ | १२५ |
| २ | पालघर | ३ | ६० | ५७ | १२० |
| ३ | रायगड | १० | १० | १९० | २१० |
| ४ | रत्नागिरी | ३० | ३ | १७७ | २१० |
| ५ | सिंधुदूर्ग | १५ | २ | १७३ | १९० |
| कोकण विभाग | | **६२** | **९२** | **७०१** | **८५५** |
| ६ | नाशिक | ३५ | ११० | ४६० | ६०५ |
| ७ | धुळे | १० | ४६ | २०४ | २६० |
| ८ | नंदुरबार | २ | ८० | ८३ | १६५ |
| ९ | जळगाव | २२ | १२ | ५५६ | ५९० |
| नाशिक विभाग | | **६९** | **२४८** | **१३०३** | **१६२०** |
| १० | अहमदनगर | ७० | ५० | ८१० | ९३० |
| ११ | पुणे | ३५ | ३५ | ५३० | ६०० |
| १२ | सोलापुर | ५० | १० | ६३० | ६९० |
| पुणे विभाग | | **१५५** | **९५** | **१९७०** | **२२२०** |
| १३ | सातारा | ५५ | २ | ५४३ | ६०० |
| १४ | सांगली | ४० | २ | ४३३ | ४७५ |
| १५ | कोल्हापूर | ४७ | ३ | ४३० | ४८० |
| कोल्हापूर विभाग | | **१४२** | **७** | **१४०६** | **१५५५** |
| १६ | औरंगाबाद | ३० | १० | ६०० | ६४० |
| १७ | जालना | ३२ | ३ | ४३५ | ४७० |
| १८ | बीड | ३५ | ५ | ५९० | ६३० |
| औरंगाबाद विभाग | | **९७** | **१८** | **१६२५** | **१७४०** |
| १९ | लातूर | २५ | ५ | ३६५ | ३९५ |
| २० | उस्मानाबाद | २० | ५ | ३६५ | ३९० |
| २१ | नांदेड | ५५ | ३५ | ४८० | ५७० |
| २२ | परभणी | १० | ५ | ४०५ | ४२० |
| २३ | हिंगोली | २० | १० | २५० | २८० |
| लातूर विभाग | | **१३०** | **६०** | **१८६५** | **२०५५** |

| अ. क्र. | जिल्हा | अनुसूचीत जाती | अनुसूचीत जमाती | सर्वसाधारण | एकूण लक्षांक |
|---|---|---|---|---|---|
| २४ | बुलढाणा | ५० | १० | ४४० | ५०० |
| २५ | अकोला | ४० | १० | २९० | ३४० |
| २६ | वाशिम | २५ | १० | २२० | २५५ |
| २७ | अमरावती | ५० | ३० | ४२० | ५०० |
| २८ | यवतमाळ | ३० | ४० | ४३० | ५०० |
| अमरावती विभाग | | **१९५** | **१००** | **१८००** | **२०९५** |
| २९ | वर्धा | २५ | १५ | १८० | २२० |
| ३० | नागपूर | ३० | १५ | २८० | ३२५ |
| ३१ | भंडारा | ३० | १० | १४० | १८० |
| ३२ | गोंदिया | २५ | ३० | १३० | १८५ |
| ३३ | चंद्रपूर | ३५ | ३५ | २४० | ३१० |
| ३४ | गडचिरोली | १५ | ४५ | ८० | १४० |
| नागपूर विभाग | | **१६०** | **१५०** | **१०५०** | **१३६०** |
| एकूण महाराष्ट्र | | **१०१०** | **७७०** | **११७२०** | **१३५००** |

परिशिष्ट -२

हमीपत्र

ठिकाण :-

दिनांक :-

प्रति,
तालुका कृषि अधिकारी,
-------------------

विषय :- मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे या घटकाकरिता द्यावयाचे हमीपत्र...

महोदय,

मी श्री/श्रीमती-------------------------- राहणार---------- तालुका----------------- जिल्हा---------------- येथील रहिवाशी असून माझ्याकडे ८ अ नुसार एकुण --------- हेक्टर क्षेत्र आहे. सर्व्हे नंबर/गट नंबर -------- चे ७/१२ उताऱ्यानुसार एकुण ---------- हेक्टर क्षेत्र असून त्यामध्ये मी वैयक्तिक शेततळे या घटकासाठी महा-डीबीटी पोर्टलवर-------x------x----- मीटर आकाराचे इनलेट आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅपसह/विरहीत (बाजू उतार-१:१ /१:१.५) करीता ऑनलाईन अर्ज केला आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र मी सादर करीत आहे.

१. वैयक्तिक शेततळे लाभ क्षेत्राची शेतजमीन माझ्या मालकीची असून त्याचा ७/१२ उतारा माझ्या नांवे आहे.
२. वैयक्तिक शेततळे लाभाकरीता मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे मी महा-डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यास बांधील आहे.
३. यापूर्वी मी कोणत्याही शासकीय योजनेमधून शेततळयाकरीता अनुदान घेतलेले नाही अथवा यापुढे घेता येणार नाही याची मला जाणीव आहे.
४. कृषि विभागाचे कृषि सहाय्यक यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे माझ्यावर बंधनकारक राहील.
५. कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.
६. मी स्वतःचा राष्ट्रीयकृत बँक / इतर बँक खाते तपशिल संबंधित कृषि सहाय्यक यांचेकडे सादर करीन.
७. वैयक्तिक शेततळे काम पुर्ण करण्यासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही याची मला जाणीव आहे.
८. शेततळयाच्या आकारमानानुसार व मी केलेल्या कामाच्या मोजमापानुसार शासनाकडून एकूण खर्चाच्या विहीत मर्यादेत अनुदान मिळणार आहे याची मला जाणीव आहे. याबाबत माझी

कोणतीही तक्रार असणार नाही. देय शासकीय अनुदाना व्यतिरिक्त येणारा खर्च मी स्वत: करीन.

९. शेततळे खोदाईचे काम मी स्वत: किंवा यंत्र धारकाकडून पुर्ण करून घेईन मात्र देय शासकीय अनुदान माझ्या स्वत:च्या बँक खातेवर जमा होणार आहे याची मला कल्पना आहे.

१०. शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करणे बंधनकारक राहील याची मला कल्पना आहे.

११. शेततळ्याची निगा व दुरूस्ती करण्याची तसेच गाळ काढणेची जबाबदारी माझी राहील.

१२. पावसाळ्यामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठीची व्यवस्था मी स्वत: करण्यास तयार आहे.

१३. शेततळयामध्ये पडून जिवीतहानी होऊ नये म्हणून मी शेततळयास स्वखर्चाने कुंपण करून घेईन.

१४. नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही याची मला जाणीव आहे.

१५. कार्यारंभ आदेश / पुर्वसंमती पत्रामध्ये नमूद प्रकाराचे व आकारमानाचे शेततळे खोदणे माझ्यावर बंधनकारक राहील.

१६. इनलेट आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅप विरहित शेततळयामध्ये पाणी उचलून टाकण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी माझी राहील. तसेच अशा शेततळयासाठी प्लॅस्टीक अस्तरीकरण करावयाचे झाल्यास मी स्वखर्चाने करीन.

१७. शेततळयाचे काम पूर्ण होताच मी विहीत नमुन्यातील काम पुर्णत्वाचा दाखला तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर करीन.

१८. शेततळे पूर्ण झाल्यावर शेततळे योजनेचा ४x३ फूट आकाराचा बोर्ड लावणे मला बंधनकारक राहील.

दिनांक / /२०

अर्जदाराची सही / अंगठा
श्री./श्रीमती --------------

परिशिष्ट -३

अर्जदाराच्या अर्जाची / मागणीपत्राची छाननी अहवालाचा नमुना.

ऑनलाईन अर्ज निवड दिनांक :   /   /                आयडी नंबर-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | (प्रथम नाव) | (वडिलांचे / पतीचे नाव) | (आडनाव) |
| २ | अर्जदाराचा पत्ता | गाव- | तालुका- | जिल्हा- |
| ३ | जात / प्रवर्ग | जात- | प्रवर्ग- | |
| ४ | एकूण जमीन धारणा (हेक्टर) व वर्गवारी | हेक्टर- | वर्गवारी- क्षेत्रानुसार :-<br>प्रवर्गानूसार:- | अल्प/अत्यल्प/बहू<br>अजा/अज/इतर |
| ५ | शेततळे घ्यावयाचा शेताचा सर्व्हे/गट क्रं. व क्षेत्र | सर्व्हे/गट क्रं.- | क्षेत्र (हेक्टर)- | |
| ६ | मागणी केलेल्या शेततळयाचे आकारमान (मीटर) | लांबी............ X रुंदी.............. X खोली | | |
| ७ | अर्जा सोबत प्राप्त कागदपत्रे | ७/१२ उतारा | होय / नाही | |
| | | ८-अ नमुना | होय / नाही | |
| | | आधार कार्ड झेरॉक्स | होय / नाही | |
| | | आधार सलग्न राष्ट्रीय कृत बॅक खाते पुस्तक पहिले पान झेरॉक्स | होय / नाही | |
| | | हमीपत्र | होय / नाही | |
| | | लाभार्थी अजा/अज असल्यास सक्षम प्राधिका-याचे जात प्रमाणपत्र/ दाखला | होय / नाही | |
| ८ | आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या वारसाचा दाखला | | होय / लागू नाही | |
| ९ | स्वत: किंवा कुटूंबातील अन्य सदस्यांनी यापूर्वी शासकीय योजनेतून शेततळे, सामुदायिक | | होय / नाही | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शेततळे अथवा बोडी याचा लाभ घेतला आहे काय? | | | |
| १० | शेतकऱ्याचे कागदपत्रांची मी स्वत: छाननी केली असून योग्य असल्याचे आढळून आले | | होय / नाही | |

शेतकऱ्याचा अर्ज व उपलब्ध कागदपत्रानुसार सदर अर्जदार वैयक्तिक शेततळे घटकाच्या लाभासाठी पात्र/अपात्र आहे.

कृषि सहायक

सजा: --------------मंडळ:---------------

परिशिष्ट - ४

मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे या घटकासाठीचे स्थळ पाहणी व जागा तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा कृषि सहाय्यक यांचा दाखला

दिनांक :- / / २०२२

| | | |
|---|---|---|
| १ | जागा पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे सपुंर्ण नांव | श्री./श्रीमती. |
| २ | पदनाम | कृषि सहायक |
| ३ | सजा | सजा ----------- मंडळ------------ |
| ४ | सर्व्हे नं. / गट नं. | |
| ५ | शेतकऱ्याने मागणी केलेल्या शेततळयाचा प्रकार | अ) इनलेट/आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅपसह ( )<br>i)बाजू उतार १:१ ( )<br>i)बाजू उतार १:१.५ ( )<br>ब) इनलेट/आऊटलेट खोदाई व सिल्ट ट्रॅपविरहीत ( )<br>i)बाजू उतार १:१ ( )<br>i)बाजू उतार १:१.५ ( ) |
| ६ | शेतकऱ्याने मागणी केलेल्या शेततळयाचे आकारमान | ---------X---------X--------- (मीटर) |
| ७ | इनलेट / आऊटलेट विरहीत शेततळ्यात पाणी उचलून टाकण्याची सुविधा उपलब्ध आहे काय? (इनलेट /आऊटलेट विरहीत शेततळ्यासाठी पाणी भरण्याची व्यवस्था पावसाळ्यात अतिरिक्त वाहून जाणा-या पाण्यातून करावी.) | होय / नाही |
| ८ | मागणी केलेल्या आकारमानाचे शेततळे घेण्यास जागा पुरेशी आहे काय? | होय / नाही |
| ९ | तांत्रिकदृष्टया कोणत्या आकारमानाचे शेततळे शिफारस करण्यात येत आहे? (यामध्ये खोदकामातून निघणा-या मातीपासून तयार होणारा भराव व कुंपणासाठी जागेसह शासन निर्णयातील मंजूर आकारमान विचारात घेऊन त्यापैकी योग्य आकारमान शिफारस करण्यात यावी.) | ---------X---------X--------- (मीटर) |

शेतकरी वैयक्तिक शेततळे घेण्यास इच्छूक असून क्षेत्रीय पाहणीत शेतकऱ्याने दाखविलेली जागा शेततळे घेण्यास तांत्रिकदृष्टया योग्य व पुरेशी आहे.

स्वाक्षरी/--------------------------

जागा पाहणी करणाऱ्या

अधिकाऱ्याचे नांव :-------------------

पदनाम :- कृषि सहाय्यक

सजा:-----------------------------

परिशिष्ट -५

निवड झालेल्या लाभार्थ्यास द्यावयाचा कार्यरंभ आदेश /पूर्व संमतीपत्र

जा.क्र./वै.शेततळे/ /२०

तालुका कृषि अधिकारी

कार्यालय..... दिनांक / /२०

प्रति,

श्री................ मु.पो.........................

ता...................जि.................

विषय :- मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे घटकाच्या मंजूरी / कार्यारंभ आदेशाबाबत...

महा-डीबीटी पोर्टलवरील संगणकीय सोडतीव्दारे आपली वैयक्तिक शेततळे या घटकासाठी निवड झालेली आहे. या घटकाच्या मार्गदर्शक सूचनेमधील पुढील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून आपणांस .......X...........X .........मीटर इतक्या आकारमानाच्या शेततळयाचे काम पुर्ण करण्यास कार्यारंभ आदेश/ पूर्व संमतीपत्र देण्यात येत आहे. सदर आदेश मिळाल्या पासून ३०दिवसांच्या आत आपण शेततळयाचे काम सुरु करावे.

| | |
|---|---|
| १ | निश्चित केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील. |
| २ | निश्चित केलेल्या आकारमानाचेच शेततळे घेणे बंधनकारक राहील. |
| ३ | काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील. तथापि नैसर्गिक आपत्तीमुळे विहीत कालावधीत काम पुर्ण होणार नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत मुदत वाढवून देण्यांत येईल. |
| ४ | काम पूर्ण झाल्यावरच अनुदानाची मागणी करता येईल. |
| ५ | कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम मिळणार नाही. |
| ६ | मजूर / मशिनच्या मालकास शासनाकडून परस्पर पेमेंट केले जाणार नाही. |
| ७ | शेततळयाच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करणे बंधनकारक राहील. |
| ८ | शेततळयाची निगा / दुरुस्तीची जबाबदारी लाभार्थी शेतक-यावर राहील. |
| ९ | पावसाळयामध्ये शेततळयात गाळ वाहून येणार नाही अथवा साठणार नाही यासाठी व्यवस्था करावी. |
| १० | शेतळयातून पिकांना पाणी देण्याची व्यवस्था लाभार्थी शेतक-यास स्वखर्चाने करावी लागेल. |
| ११ | कृषि सहाय्यक यांनी जागेची निवड व आखणी करुन दिल्यावरच मंजूर अंदाजपत्रका सोबतच्या सर्व्हे नं. /गट नं. ----------- मध्येच काम करावे. आपले मर्जीने कामे सुरु केल्यास शेततळयाचे अनुदान काढण्याची जबाबदारी शासनाची राहणार नाही. |
| १२ | मंजूर शेततळे कामाचा काम पुर्ण झाल्यावर ४ फूट X ३ फूट आकाराचा बोर्ड लावण्यांत यावा. |
| १३ | सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात काम सुरु न झाल्यास आदेश रद्द ठरेल. |

तालुका कृषि अधिकारी

तालुका------- जिल्हा----------

प्रत:- १.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

२.उपविभागीय कृषि अधिकारी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

## परिशिष्ट – ६

मंजूर वैयक्तिक शेततळयाचे काम १०० टक्के पूर्ण झाल्यावर लाभार्थी शेतक-याचा १०० टक्के पूर्णत्वाचा अहवाल

प्रति,

तालुका कृषि अधिकारी

.........................

मी श्री / श्रीमती ........................................... गांव ............ तालुका ........... जिल्हा..................... असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषि अधिकारी...........................यांच्या कार्यारंभ आदेश/ पूर्व संमतीपत्र क्र......................दिनांक / /२० अन्वये मला मंजूर केलेल्या ..... X .......X ..... मीटर या आकारमानाच्या शेततळयाचे काम आखणी करून देण्यांत आल्या प्रमाणे मी दिनांक / /२० अखेर १०० टक्के पूर्ण केले आहे.

कृपया, शेततळयाच्या कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेणे व त्यापोटी देय अनुदानाची शिफारस करणेबाबत संबंधितांस सूचित करण्यांत यावे. सदर अनुदान माझ्या खाली नमूद आधार लिंक्ड बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

बँकेचे नांव.....................................शाखा............................. खाते क्र.............................

(बँक खातेपुस्तकाची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे.)

दिनांक / /२० अर्जदाराची सही / अंगठा

श्री./श्रीमती ------------------

परिशिष्ट- ७

काम पूर्ण झालेल्या शेततळयाची मोका तपासणी व मोजमाप अहवाल

योजना:- मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे, तपासणीचा दिनांक :- / /२०

| | | |
|---|---|---|
| १ | लाभार्थीचे नांव | श्री./श्रीमती. |
| २ | गाव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | संवर्ग | अ.जाती/अ.जमाती/इतर, अल्प/अत्यल्प/बहु |
| ६ | वैयक्तिक शेततळे मंजूरीचा तपशिल<br>अ) कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक<br>ब) स.अ.प. तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक<br>क) प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक | <br>कार्यारंभ आदेश क्रमांक --------, दिनांक / /२०<br>तांत्रिक मान्यता क्रमांक---------,दिनांक / /२०<br>प्र.मान्यता क्रमांक --------------,दिनांक / /२० |
| ७ | वै. शेततळे घेतलेल्या शेताचा सर्व्हे नंबर / गट क्र. | सर्व्हे नंबर/ गट क्र.---------- |
| ८ | मंजूर शेततळयाचे आकारमान (अंदाजपत्रकानुसार) | लांबी..........Xरुंदी......Xखोली (मीटरमध्ये) |
| ९ | प्रत्यक्ष तपासणीमध्ये आढळलेले शेततळयाचे<br>अ) आकारमान<br>ब)घनफळ | <br>लांबी..........Xरुंदी......Xखोली (मीटरमध्ये)<br>-----------------------------घनमीटर |
| १० | मोका तपासणीवेळी शेततळयामध्ये सविस्तर अंदाजपत्रकानुसार आढळलेल्या उणिवा | |
| ११ | मंजूर आकारमानानुसार अनुदानाची रक्कम | रूपये-------------------------/- |
| १२ | प्रत्यक्ष तपासणीनुसार शेततळयास देय होणरी रक्कम | रूपये----------/- (अक्षरी रु.-----------------) |
| १४ | शेततळयाचा लाभार्थ्यासह फोटो | फोटो सोबत जोडावा |
| १५ | शेततळयाचे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश व रेखांश (जिओ टॅगींग) | अक्षांश-----<br>रेखांश----- |

उपरोक्त प्रमाणे मी नोंदी घेतल्या असून केलेल्या कामानुसार शेततळयाचे आकारमान ............................... आहे व रक्कम रुपये ............../- (अक्षरी रु.-----------------)इतके अनुदान अदा करण्यास हरकत नाही. सोबत मापन पुस्तिकेची प्रत /झेरॉक्स प्रत जोडली आहे.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| नाव------------------------ | नाव------------------------ |
| कृषि सहाय्यक, सजा----------- | कृषि पर्यवेक्षक, सजा----------- |

उपरोक्त प्रमाणे तपासणी माझ्या समक्ष केली असून घेतलेल्या नोंदी व देय अनुदान मला मान्य आहेत.

सही /-
लाभार्थ्याचे
नांव.......................
दिनांक:-

उपरोक्त वैयक्तिक शेततळे कामाच्या मापन पुस्तकातील नोंदी मी तपासल्या असून त्या बरोबर आहेत. त्याप्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यास ......... X.............. X......... मीटर या आकारमानाप्रमाणे रक्कम रूपये................./- (अक्षरी रु.------------------) अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सही/-
नाव-----------------------
कृषि पर्यवेक्षक, सजा---------

उपरोक्त वैयक्तिक शेततळे कामाच्या नोंदीची मी खातरजमा केली असून त्या बरोबर आढळून आल्या. त्याप्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यास ......... X.............. X......... मीटर या आकारमानाप्रमाणे रक्कम रूपये................./- (अक्षरी रु.------------------) अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सही/-
नाव-----------------------
मंडळ कृषि अधिकारी, -------